लोकमत

नसीर अत्तार




१) शिवाजी विद्यापीठात सोमवारी डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. एस. एस. चव्हाण. व्यासपीठावर कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते. २) विद्यापीठ गुणवंत सेवक पुरस्कार स्वीकारताना मनोहर कुलकर्णी. ३) विद्यापीठ गुणवंत सेवक पुरस्कार स्वीकारताना लक्ष्मण परीट. ४) महाविद्यालयीन गुणवंत प्राचार्य पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे. ५) बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. भरत नाईक. ६) नॅक मानांकन प्राप्त संलग्न महाविद्यालये व संस्था यांचा प्राचार्य पुरस्कार इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा यांना देण्यात आला.

## डॉ. उद्धव भोसले : शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन थाटात; शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रतिकृतीचे अनावरण

# रोजगारनिर्मिती हा विद्यापीठांचाही प्राधान्यक्रम हवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : नोकऱ्या देणे हे विद्यापीठांचे पहिले काम नसले, तरी विद्यापीठांच्या प्राधान्यक्रमावरील हा प्रमुख विषय असायला हवा. बेरोजगारीची तीव्रता कमी करण्यात अपयशी ठरल्यास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील, असा इशारा नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांनी सोमवारी येथे दिला. शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

पश्चिम महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये शिवाजी विद्यापीठाने मौलिक स्वरूपाचे योगदान दिले असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हानांचा वेध घेताना डॉ. भोसले म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय स्तरावरील आघाडीच्या ३०० विद्यापीठांच्या यादीत भारतातील एकही विद्यापीठ नाही. काळानुरुप बदलासाठीची तयारी नसणे हे त्यामागील महत्त्वाचे कारण आहे. बेरोजगारी हे आपल्या व्यवस्थेसमोरील सर्वाधिक मोठे आव्हान आहे. देशातील सुमारे ३५ टक्के विद्यार्थी पदवी शिक्षणाला प्रवेश घेतात; पण ते पूर्ण करीत नाहीत. विद्यापीठीय व्यवस्थेतून शिकून बाहेर पडणाऱ्यांमधील रोजगारक्षमतेचा अभाव हेच बेरोजगारीचे प्रमुख कारण आहे. आपल्याकडे खासगीच नव्हे, तर सार्वजनिक क्षेत्रांतही रोजगाराच्या भरपूर संधी आहेत. तथापि, शिक्षणाच्या बरोबरीनेच आवश्यक कौशल्ये नसल्याने यापासून तरुण वंचित राहतात. हे चित्र बदलण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा.

डॉ. भोसले म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने स्थापनेपासूनच अद्ययावत अभ्यासक्रम सुरु करण्यास प्राधान्य दिले, तरी पारंपरिक शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविले. यंदाचा वर्धापनदिन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारकिर्दीतील अखेरचा आहे. त्याचे भावनिक प्रतिबिंब त्यांच्या अध्यक्षीय भाषणात दिसून आले. साडेचार वर्षांपूर्वी विद्यापीठात रुजू झालो; पण आता अनेकांशी माझे जन्मभराचे ऋणानुबंध निर्माण झाले. पूर्णत: कोल्हापूरमय झालो, अशी भावना डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.

डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. तत्पूर्वी, डॉ. भोसले यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. डॉ. मधुकरराव गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.

## गौरव सोहळा



विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रतिकृतीचे डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. बी. आर. खेडकर यांनी मूळ पुतळा साकारला आहे. त्या पुतळ्याच्या प्रतिकृती पगमार्क आर्ट गॅलरीचे रमण कुलकर्णी, अतुल डाके आणि मनोहर टॉईजचे दीपक महामुनी यांनी साकारल्या आहेत. त्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

### सातारा कॉलेजचा सन्मान

'नॅक'चे 'अ' मानांकन मिळविणाऱ्या ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा व आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, रामानंदनगर, बुर्ली या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

# 'पदार्थ विज्ञान'ला उत्कृष्ट अधिविभागाचा पुरस्कार

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि शिक्षक, सेवकांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार सोमवारी केला. प्रा. डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. याप्रसंगी शिवाजी विद्यापाठातील पदार्थ विज्ञान अधिविभागाला उत्कृष्ट अधिविभागाचा पुरस्कार दिला.

राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक वाढविणारे प्राध्यापक, कर्मचारी यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

प्रथमच विद्यापीठातील अधिविभागाला 'उत्कृष्ट अधिविभाग' असा पुरस्कार देणार असल्याने त्यासाठी अधिविभागांकडून प्रस्ताव मागविले होते. तज्ज्ञ समिती नियुक्त करून त्यांच्यामार्फत उत्कृष्ट अधिविभागाची निवड करण्यात आली. यामध्ये प्रथमच 'पदार्थ विज्ञान' अधिविभागाने बाजी मारली. त्यांना दहा लाख रुपये, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत आणि पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी विविध अधिविभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे कुटुंबीय, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नसीर अत्तार




शिवाजी विद्यापीठात सोमवारी डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते पदार्थ विज्ञान अधिविभागाला उत्कृष्ट अधिविभागाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

### परीक्षा बनल्या मेमरी टेस्ट..

आजच्या आपल्या परीक्षा या मेमरी टेस्ट आहेत. त्यामध्ये लॉजिकल, ॲनालिटीकल, ॲटिट्यूड अगर ॲप्टिट्यूड यांना स्थान नाही. खरे तर विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचा पूर्ण अंदाज येण्यासाठी तशा प्रकारच्या चाचण्यांची गरज आहे. विद्यार्थ्यांनी अध्ययन व नवनिर्मितीचे बीज विकसित करण्याच्या दृष्टीने सत्य, ज्ञान आणि परिश्रम या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, असा संदेशही डॉ. भोसले यांनी दिला.

### पारितोषिक विजेते

**उत्कृष्ट अधिविभाग** : पदार्थ विज्ञान अधिविभाग. **विद्यापीठातील गुणवंत शिक्षक** : प्रा.डॉ. संजय शामराव चव्हाण (रसायनशास्त्र अधिविभाग), **विद्यापीठातील गुणवंत सेवक** : मनोहर अनंत कुलकर्णी (सहायक अधीक्षक, आस्थापना विभाग), लक्ष्मण भीमराव परीट (प्र. शाळा परिचर, रसायनशास्त्र अधिविभाग). **संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य** : डॉ. धनाजी गोविंदराव कणसे (भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली). **बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक** : प्रा.डॉ. भरत आदाप्पा नाईक (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर). **अ नॅक मानांकन प्राप्त संलग्न महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य** : इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज (सातारा), आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (रामानंदनगर बुर्ली). **उत्कृष्ट फोटोग्राफी पुरस्कार** : प्रथम (विभागून) : शुभम रमेश हत्तरकी, संकेत उदय माळी, द्वितीय (विभागून) : सुंदरकुमार कांबळे, सुभाष पोपटराव वाणी, तृतीय (विभागून) : उदयणादित्य पाटील, युवराज जगताप. याप्रसंगी शिक्षकांच्या व प्रशासकीय सेवकांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

लोकमत

## गायकवाड : अ. भा. आंतर विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरु चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन

# साहित्याप्रमाणेच क्रीडा उत्कृष्ट कला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** साहित्याप्रमाणेच क्रीडा ही एक उत्कृष्ट कला आहे. प्रशासकीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन कामकाजांमधील ताण कमी करण्यासाठी, बौद्धिक चालना मिळण्यासाठी व तणावमुक्त जीवन जगण्यासाठी क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी कुलगुरु डॉ. मधुकरराव गायकवाड यांनी सोमवारी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडासंकुल येथे आयोजित १७ व्या अ. भा. आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरु चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी डॉ. मधुकरराव गायकवाड म्हणाले, खेळाडू, कर्मचाऱ्यांमधील सांघिक भावना, सहकार्य, समन्वय जागृत करण्यासाठी या स्पर्धा महत्त्वाच्या ठरतात. शिवाजी विद्यापीठाने यंदा देश पातळीवरील विद्यापीठांतील कर्मचाऱ्यांसाठी टी-२० क्रिकेट स्पर्धेचे केलेले आयोजन हे अत्यंत अभिनव आहे.

विद्यापीठ क्रीडा विभागाचे प्र. संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राज्य व देशभरातून विद्यापीठीय क्रिकेट खेळाडूंचे २० संघ दाखल झाले आहेत. अध्यक्षीय संघ व जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्यामध्ये प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. कोरबू यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी भारतीय दिव्यांग संघातील आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू कमलाकर कराळे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, खेळाडू उपस्थित होते.

### 'कुलगुरु चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेचे सामने असे

| | | |
|---|---|---|
| | | उद्याचे सामने - (सकाळ सत्र) |
| सी १ वि सी ५ | : | पंजाब विद्यापीठ, चंदीगड विरुद्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर |
| सी ३ वि.सी ४ | : | महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक विरुद्ध महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी |
| डी २ वि.डी ३ | : | दीनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर विरुद्ध केंद्रीय विद्यापीठ, जम्मू |
| | | (दुपार सत्र) |
| ए १ वि. ए ३ | : | जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली विरुद्ध पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना |
| ए ४ वि. ए ५ | : | सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विरुद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव |
| बी १ वि. बी २ | : | जम्मू विद्यापीठ, जम्मू विरुद्ध मुंबई विद्यापीठ, मुंबई |

# प. महाराष्ट्राच्या विकासात विद्यापीठाचे योगदान

## वर्धापनदिनी डॉ. उद्धव भोसले यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'पारंपरिक शिक्षणाशी नाळ ठेवत नव्या बदलाच्या प्रवाहातील शिक्षण, संशोधन, शैक्षणिक करार यातून काळाची गरज ओळखत ज्ञानाच्या आदानप्रदानाची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम शिवाजी विद्यापीठाने केले. पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा सर्वांगीण विकासामध्ये शिवाजी विद्यापीठाने मौलिक स्वरुपाचे योगदान दिलेले आहे', असे गौरवोद्‌गार नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी काढले. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर पहिल्या ३०० विद्यापीठात देशातील एकही विद्यापीठ नसून कालसुसंगत बदलांसाठी भारतीय विद्यापीठांनी प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिन समारंभात बोलताना प्रमुख पाहुणे व नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले. व्यासपीठावर (डावीकडून) कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के.

### कोल्हापूरकर झालो

यंदाचा वर्धापन दिन हा कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या कारकीर्दीतील अखेरचा आहे. त्याचे भावनिक प्रतिबिंब त्यांच्या भाषणात दिसून आले. 'साडेचार वर्षांपूर्वी विद्यापीठात रुजू झालो, तेव्हा माझे, माझ्या कुटुंबियांचे येथे कोणीच नव्हते; मात्र या कालावधीत विद्यापीठ परिक्षेत्रात अनेकांशी माझे जन्मभराचे ऋणानुबंध निर्माण झाले. 'मी पूर्णतः कोल्हापूरकर झालो,' अशी भावना डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. भोसले म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारित येणाऱ्या क्षेत्राचे भौगोलिक स्थान व महत्त्व लक्षात घेऊन त्याला पूरक व पोषक असे अभ्यासक्रम राबविण्यावर या विद्यापीठाचा भर हा एका योग्य शिक्षणरचनेचे द्योतक आहे. इनोव्हेशन या संकल्पनेतून विद्यापीठाने खूप वेगळे काम केले आहे. राज्यातील अन्य विद्यापीठे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने राबविलेल्या उपक्रमांचे अनुकरण करीत आहेत. बेरोजगारी हे आपल्या व्यवस्थेसमोरील सर्वाधिक मोठे आव्हान आहे. रोजगाराच्या संधी असूनही त्यासाठी हवा असलेला संवाद अपुरा असल्याने शिक्षण व अर्थार्जन यांच्यातील दरी वाढत आहे. त्यासाठी शिक्षणाच्या बरोबरीनेच आवश्यक असणारी विविध कौशल्ये अवगत करणेही गरजेचे असते. याबाबत गांभीर्य नसल्याने रोजगाराच्या संधींपासून युवा वर्ग वंचित राहतो. हे चित्र बदलण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने चालविलेला आऊटकम बेस्ड स्कील एज्युकेशनचा उपक्रम अत्यंत स्तुत्य व अनुकरणीय आहे. परीक्षा पद्धतीत बदल करणे ही गरज असून भविष्यात विद्यार्थ्यांच्या आकलनक्षमता तपासणाऱ्या परीक्षा बनवल्या पाहिजेत. पाठ्यपुस्तकापलीकडील शिक्षण हा विचार अध्ययनाचे सूत्र बनले तर खूप परिवर्तन होईल.'

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'काळाची पावले ओळखून विद्यापीठीय व्यवस्थेमध्ये इनक्युबेशन केंद्रांचे महत्त्व लक्षात घेऊन तशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे सुतोवाच केले होते. त्यानुसार विद्यापीठात शिवाजी सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँन्ड लिंकेजिससह तीन इनक्युबेशन केंद्रांबरोबरच संलग्नित २१ महाविद्यालयांमध्येही इनक्युबेशन सेंटर स्थापन झाली आहेत. तेवढ्यावरच न थांबता विद्यापीठाने सेक्शन-८ कंपनी स्थापन केली.'

तत्पूर्वी, विद्यापीठ प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

# कुलगुरू चषक स्पर्धेला प्रारंभ

कोल्हापूर : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. राज्य व देशभरातून विद्यापीठीय क्रिकेट खेळाडूंचे २० संघ दाखल झालेले आहेत. अध्यक्षीय संघ व जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्यामध्ये प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी भारतीय दिव्यांग संघातील आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू कमलाकर कराळे हेही उपस्थित होते.

आजचे सामने – पंजाब विद्यापीठ, चंडीगड वि. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ. महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक वि. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. दीनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ वि. केंद्रीय विद्यापीठ, जम्मू. जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली वि. पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना. सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वि. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. जम्मू विद्यापीठ वि. मुंबई विद्यापीठ, मुंबई

# ‘पदार्थविज्ञान’ ठरला सर्वात उत्कृष्ट अधिविभाग

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने यावर्षी प्रथमच घोषित करण्यात आलेला उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार पदार्थविज्ञान अधिविभागाने पटकावला. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्र या दोन गटातील अधिविभागांचे मूल्यमापन करून दहा लाख रुपयांच्या पुरस्कारासाठी

## शिवाजी विद्यापीठात वर्धापनदिनी पुरस्काराने गौरव



शिवाजी विद्यापीठातील उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार स्वीकारताना अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील.

### पुरस्काराचे अन्य मानकरी

प्रा. डॉ. संजय शामराव चव्हाण (रसायनशास्त्र अधिविभाग) यांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात आला. मनोहर अनंत कुलकर्णी (सहाय्यक अधीक्षक, आस्थापना विभाग), लक्ष्मण भीमराव परीट (प्र. शाळा परिचर, रसायनशास्त्र अधिविभाग) यांना गुणवंत सेवक सन्मान प्रदान करण्यात आला. डॉ. धनाजी गोविंदराव कणसे (भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली) यांना उत्कृष्ट प्राचार्य म्हणून पुरस्कृत करण्यात आले. प्रा. डॉ. भरत आदाप्पा नाईक (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर) यांना बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या फोटोग्राफी स्पर्धेतील प्रथम (विभागून): शुभम रमेश हत्तरकी, संकेत उदय माळी, द्वितिय (विभागून): सुंदरकुमार कांबळे, सुभाष पोपटराव वाणी, तृतीय (विभागून) उदयणादित्य पाटील, युवराज जगताप या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

पदार्थविज्ञान या अधिविभागावर शिक्कामोर्तब करण्यात आले. रोख रक्कम, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विभागाच्या वतीने अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त सोमवारी विविध उपक्रमांचे उद्घाटन, गुणवंत प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, सेवक यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्यासह अधिकारी, अधिव्याख्याते उपस्थित होते.

विद्यापीठाचा मानबिंदू असलेला विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याच्या प्रतिकृतीचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. बी.आर. खेडकर यांनी मूळ पुतळा साकारला आहे. त्या पुतळ्याच्या प्रतिकृती पगमार्क आर्ट गॅलरीचे रमण कुलकर्णी, अतुल डाके आणि मनोहर टॉइजचे दीपक महामुनी यांनी साकारल्या आहेत. त्यांचाही गौरव करण्यात आला. शिवपुतळ्याच्या प्रतिकृतीचे अनावरण करणे, हा आपल्या आयुष्यातील गौरवाचा क्षण असल्याची भावना डॉ. भोसले यांनी व्यक्त केली. यावेळी पहिली प्रतिकृती कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कुलगुरू डॉ. भोसले यांना भेट दिली.

त्याचप्रमाणे विद्यापीठाचा बॅज, फोल्डर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे 'शिव-ज्ञानसागर इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी' व 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम' (आयआरआयएनएस) आणि वॉक थ्रू लीड बॉटेनिकल गार्डन या उपक्रमांचेही कुलगुरू डॉ. भोसले यांच्या हस्ते व्हर्चुअल उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यापीठ, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय, कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. तसेच, प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर 'नॅक'चे 'अ' मानांकन मिळविणाऱ्या ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा व आर्ट्स, कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज, रानंदनगर, बुर्ली या संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार झाला.

दरम्यान, सकाळी विद्यापीठातील बॉटेनिकल लीड गार्डनमध्ये डॉ. उद्धव भोसले यांच्यासह डॉ. देवानंद शिंदे, वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यासमवेत भटकंती मोहिम राववण्यात आली. यावेळी डॉ. एस. आर. यादव, डॉ. मकरंद ऐतावडे आदी उपस्थित होते.

पुढारी

# तणावमुक्त जीवनशैलीसाठी क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन आवश्यक

## माजी कुलगुरू डॉ. गायकवाड : कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रशासकीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन कामकाजांमधील ताण कमी करण्यासाठी, बौद्धिक चालना मिळण्यासाठी व तणावमुक्त जीवन जगण्यासाठी क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन देणे, हा स्तुत्य उपक्रम आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे आयोजित १७ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा-२०१९ या स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, कर्मचाऱ्यांनी क्रीडा कौशल्ये आत्मसात केल्यास आनंदी, आरोग्यमय आणि उत्साही जीवन जगता येते. विद्यापीठ क्रीडा विभागाचे प्र. संचालक डॉ.पी. टी. गायकवाडयांनीप्रास्ताविककेले.राज्यव देशभरातून विद्यापीठीय क्रिकेट खेळाडूंचे २० संघ दाखल झाले आहेत. अध्यक्षीय संघ व जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्यामध्ये प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रकाश कुंभार, भारतीय दिव्यांग संघातील आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू कमलाकर कराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा : आजचे सामने...

**सकाळचे सत्र : सी १ वि. सी ५ :** पंजाब विद्यापीठ, चंदीगड विरुद्ध राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, **सी ३ वि. सी ४ :** महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक विरुद्ध महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, **डी २ वि. डी ३ :** दीनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ विरुद्ध केंद्रीय विद्यापीठ, जम्मू.

**दुपारचे सत्र : ए १ वि. ए ३ :** जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली विरुद्ध पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना, **ए ४ वि. ए ५ :** सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विरुद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, **बी १ वि. बी २ :** जम्मू विद्यापीठ, जम्मू विरुद्ध मुंबई विद्यापीठ, मुंबई.

पुढारी


# पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात विद्यापीठाचे मौलिक योगदान

## कुलगुरू डॉ. उद्धव भोसले; शिवाजी विद्यापीठ वर्धापनदिन उत्साहात : विविध उपक्रमांचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा सर्वांगीण विकासामध्ये शिवाजी विद्यापीठाने मौलिक स्वरूपाचे योगदान दिले आहे, असे गौरवोद्गार नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभात बोलताना नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले. दुसऱ्या छायाचित्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या प्रतिकृती अनावरणप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. (छाया : पप्पू अत्तार)**

### विद्यापीठातील गुणवंत शिक्षक

प्रा. डॉ. संजय शामराव चव्हाण (रसायनशास्त्र अधिविभाग). विद्यापीठातील गुणवंत सेवक : मनोहर अनंत कुलकर्णी (सहायक अधीक्षक, आस्थापना विभाग), लक्ष्मण भीमराव परीट (प्र. शाळा परिचर, रसायनशास्त्र अधिविभाग). संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य: /डॉ. धनाजी गोविंदराव कणसे (भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली). बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक : प्रा.डॉ. भरत आदाप्पा नाईक (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर). उत्कृष्ट फोटोग्राफी पुरस्कार : प्रथम (विभागून) : शुभम रमेश हत्तरकी, संकेत उदय माळी, द्वितीय (विभागून) : सुंदरकुमार कांबळे, सुभाष पोपटराव वाणी, तृतीय (विभागून): उदयणादित्य पाटील, युवराज जगताप.

कुलगुरू डॉ. भोसले म्हणाले, शैक्षणिक क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर व्यापक प्रगती केली असली तरी आजही आंतरराष्ट्रीय स्तरावरील आघाडीच्या ३०० विद्यापीठांच्या यादीत भारतातील एकही विद्यापीठ नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे कालसुसंगत बदलांसाठी भारतीय विद्यापीठांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. बेरोजगारी हे व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे. नोकऱ्या देणे हे विद्यापीठांचे पहिले काम नसले तरी विद्यापीठांच्या प्राधान्यक्रमावरील हा प्रमुख विषय असायला हवा.

विद्यापीठीय परीक्षा पद्धतीत आमूलाग्र बदलाची गरज आहे. आजच्या परीक्षा मेमरी टेस्ट आहेत. त्यामध्ये लॉजिकल, अॅनालिटीकल, अॅटिट्यूड व अॅप्टिट्यूड यांना स्थान नाही. विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेचा पूर्ण अंदाज येण्यासाठी तशा प्रकारच्या चाचण्यांची गरज आहे. विद्यार्थ्यांनी अध्ययन व नवनिर्मितीचे बीज विकसित करण्याच्या दृष्टीने सत्य, ज्ञान आणि परिश्रम या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, असा संदेशही त्यांनी दिला.

'मी पूर्णतः कोल्हापूरमय झालो,' अशी भावना भाषणाच्या सुरुवातीला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, विद्यापीठात आज शिवाजी सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजिससह तीन इन्क्युबेशन केंद्रांबरोबरच संलग्नित २१ महाविद्यालयांमध्येही इन्क्युबेशन सेंटर स्थापन झाली आहेत. शिवाजी विद्यापीठआयएसओ-९००१:२०१५ प्रमाणित असून प्रशासकीय प्रक्रियेचे स्टँडर्डायझेशन करण्याच्या दिशेने विद्यापीठाची जागतिक निकषांनुसार वाटचाल सुरू आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठाने संशोधन धोरण निश्चिती केली आहे. विद्यापीठाने कौशल्य विकासासाठी गेल्या चार वर्षांत विविध उपक्रम हाती घेतले. त्याचे परिणामही सकारात्मक दिसून आले आहेत. यंदाचा वर्धापन दिन हा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारकिर्दीतील अखेरचा आहे. त्याचे भावनिक प्रतिबिंब त्यांच्या आजच्या अध्यक्षीय भाषणात दिसून आले.

**विविध उपक्रमांचे उद्घाटन**

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याच्या प्रतिकृतीचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते अनावरण झाले. विद्यापीठाचा बॅज, फोल्डर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे 'शिव-ज्ञानसागर इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी' व 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम' (आयआरआयएनएस) व वॉक थ्रू लीड बॉटेनिकल गार्डन या उपक्रमांचे व्हर्च्युअल उद्घाटन झाले. याप्रसंगी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय व कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाने यावर्षीपासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरवात केली आहे. त्यानुसार यंदाचा उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पहिला पुरस्कार पदार्थविज्ञान विभागाने पटकाविला. त्यांना दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. 'नॅक'चे 'अ' मानांकन मिळविणाऱ्या ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा व आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, रामानंदनगर, बुर्ली या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

**'पदार्थविज्ञान' विभाग ठरला उत्कृष्ट**

तत्पूर्वी, विद्यापीठ प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसी संचालक डॉ. आर. के. कामत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

19 NOV 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ,

# राज्याच्या विकासात शिवाजी विद्यापीठाचे मौलिक योगदान

## मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले; शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा वर्धापनदिन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

पश्चिम महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशा सर्वांगीण विकासामध्ये शिवाजी विद्यापीठाने मौलिक स्वरूपाचे योगदान दिलेले आहे, असे गौरवोद्‌गार नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभात बोलताना नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.** (छाया : एस. अली)

कुलगुरू डॉ. भोसले म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने स्थापनेपासूनच अद्ययावत अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य दिले असले, तरी पारंपरिक शिक्षणाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरवले आहे. सर्वत्र इनोव्हेशनचा बोलबाला आहे. तथापि, इनोव्हेशनचे खरे काम शिवाजी विद्यापीठामध्येच होत आहे. राज्यातील अन्य विद्यापीठे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी विद्यापीठाने राबवलेल्या उपक्रमांचे अनुसरण करत आहेत. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यामुळे राज्यभरातील विद्यापीठांमध्ये अशा प्रकारची सकारात्मक देवाणघेवाण सुरू झाली आहे. राज्यातील ज्या विद्यापीठांचे प्रभारी कुलगुरुपद त्यांनी भूषवले, तेथे त्यांनी त्यांचा ठसा उमटवला आहे.

आजच्या आपल्या परीक्षा या मेमरी टेस्ट आहेत. त्यामध्ये लॉजिकल, अॅनालिटिकल, अॅटिट्यूड अगर अॅप्टिट्यूड यांना स्थान नाही. त्यांच्या आधारावरच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून पुण्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि पुढे पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या तीन विद्यापीठांचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची अभूतपूर्व संधी मला लाभली, याचे सारे श्रेय शिवाजी विद्यापीठ परिवाराला आहे. मुंबई विद्यापीठाची जबाबदारी ही तर अत्यंत अभूतपूर्व परिस्थितीत माझ्याकडे आली होती. सुमारे नऊ महिने ती सावरण्यासाठी मी अथकपणे कार्यरत होतो. या कालावधीत माझ्या इथल्या परिवाराने माझी स्थिती समजून घेत इथला कारभार अत्यंत जबाबदारीने चालवला. कधीही तक्रारीला जागा ठेवली नाहीत, याबद्दल कौतुक करावे तितके थोडेच आहे.

### कोल्हापूरमय झालो : कुलगुरू

यंदाचा वर्धापनदिन हा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारकीर्दीतील अखेरचा आहे. त्याचे भावनिक प्रतिबिंब त्यांच्या आजच्या अध्यक्षीय भाषणात दिसून आले. साडेचार वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठात रुजू झालो, तेव्हा माझे, माझ्या कुटुंबीयांचे येथे कोणीच नव्हते; मात्र या कालावधीत विद्यापीठ परिक्षेत्रात अनेकांशी माझे जन्मभराचे ऋणानुबंध निर्माण झाले. 'मी पूर्णतः कोल्हापूरमय झालो,' अशी भावना कुलगुरू डॉ. शिंदे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2019
पुण्यनगरी

# विद्यापीठ वर्धापनदिनी विविध उपक्रमांचे उद्‌घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचा मानबिंदू असलेल्या विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याच्या प्रतिकृतीचे प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. बी. आर. खेडकर यांनी मूळ पुतळा साकारला आहे. त्या पुतळ्याच्या प्रतिकृती पगमार्क आर्ट गॅलरीचे रमण कुलकर्णी, अतुल डाके आणि मनोहर टॉईजचे दीपक महामुनी यांनी साकारल्या आहेत. त्यांचाही समारंभात गौरव करण्यात आला.

विद्यापीठाचा बॅज, फोल्डर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे 'शिव-ज्ञानसागर इन्स्टिट्यूशनल रिपॉझिटरी' व 'इंडियन रिसर्च इन्फॉर्मेशन नेटवर्क सिस्टीम' (आयआरआयएनएस) आणि वॉक थ्रू लीड बॉटेनिकल गार्डन या उपक्रमांचेही नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते व्हर्च्युअल उद्घाटन करण्यात आले.

यावेळी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे गुणवंत पाल्य यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. तसेच प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर 'नॅक'चे 'अ' मानांकन मिळवणाऱ्या इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा व आर्टस्, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज, रमानंदनगर, बुर्ली या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाने या वर्षीपासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरुवात केली. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्र असे दोन गट करून अधिविभागांचे सर्वंकष काटेकोर मूल्यमापन करण्यात येऊन हे पुरस्कार देण्यात येत असून, संबंधित विभागाला पारितोषिकापोटी दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देण्याचे ठरले. त्यानुसार यंदाचा उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पहिला पुरस्कार पदार्थविज्ञान विभागाने पटकावला. विभागाच्या वतीने अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील यांनी कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार स्वीकारताना अधिविभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील.** (छाया : एस. अली)

वर्धापनदिन समारंभात प्रदान करण्यात आलेल्या विविध पारितोषिक विजेत्यांची नावे अशी : गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. संजय शामराव चव्हाण (रसायनशास्त्र अधिविभाग), विद्यापीठातील गुणवंत सेवक : मनोहर अनंत कुलकर्णी (सहायक अधीक्षक, आस्थापना विभाग), लक्ष्मण भीमराव परीट (प्र. शाळा परिचर, रसायनशास्त्र अधिविभाग), संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य : डॉ. धनाजी गोविंदराव कणसे (भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली), बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक : प्रा. डॉ. भरत आदाप्पा नाईक (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर), उत्कृष्ट फोटोग्राफी पुरस्कार : प्रथम (विभागून): शुभम रमेश हत्तरकी, संकेत उदय माळी, द्वितीय (विभागून) : सुंदरकुमार कांबळे, सुभाष पोपटराव वाणी, तृतीय (विभागून) : उदयणादित्य पाटील, युवराज जगताप.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसी संचालक डॉ. आर. के. कामत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जागतिक पटलावर मोहर उमटवण्याचे आव्हान

## कुलगुरू प्रा. डॉ. उद्धव भोसले; संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, रोजगारक्षमता वाढवण्यावर भर हवा

**» शिवाजी विद्यापीठ वर्धापन दिन**

**कोल्हापूर, ता. १८ : नालंदा, तक्षशीला अशा आंतरराष्ट्रीय विद्यापीठांची परंपरा भारतीय विद्यापीठांसमोर आहे. दरवर्षी तीन कोटी युवकांना उच्चशिक्षित करणारी विद्यापीठे आमच्याकडे आहेत. असे असूनही शैक्षणिक दर्जा ठरवणाऱ्या आंतरराष्ट्रीय नामावलीमध्ये आपला निभाव लागत नाही. आयआयटीसारख्या संस्थाही स्पर्धेत मागे पडतात. भविष्यात जागतिक पटलावर मोहर उमटवण्याचे आव्हान भारतीय विद्यापीठांसमोर आहे. संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता आणि रोजगारक्षमता वाढवूनच वेगळे स्थान निर्माण करू शकतो, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात आज ते बोलत होते.**

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनाचा दिमाखदार सोहळा आज राजर्षी शाहू सभागृहामध्ये झाला. डॉ. भोसले प्रमुख अतिथी होतो. सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन केले. डॉ. शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत केले. डॉ. भोसले यांच्या हस्ते इंडियन रिसर्च इनफॉरमेशन नेटवर्क सिस्टीम, शिव-ज्ञानसागर इन्स्टिट्यूशनल रिपॉसिटरी ऑफ शिवाजी युनिव्हर्सिटी याचे अनावरण केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या छोट्या प्रतिकृतीचे अनावरणही याप्रसंगी केले.

डॉ. भोसले म्हणाले, ''भारतीय विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता चांगली आहे. दरवर्षी सुमारे ३ कोटी विद्यार्थी या संस्थांमधून उच्च शिक्षण घेत असतात. असे असले तरी जागतिक क्रमवारीमध्ये भारतीय विद्यापीठे मागे पडतात. वास्तविक तक्षशीला, नालंदा या सारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांची आपल्याला परंपरा आहे. आंतराष्ट्रीय मानांकनाच्या यादीत देशातील एकही शिक्षण संस्था पहिल्या ३०० मध्ये नाही. कारण आपण काळाबरोबर जात नाही.''



**कोल्हापूर : वर्धापन दिन समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. उद्धव भोसले. व्यासपीठावर (डावीकडून) कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

### शिवाजी विद्यापीठ पथदर्शी



शिवाजी विद्यापीठाबाबत डॉ. भोसले म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठ हे अन्य विद्यापीठांचे नेतृत्व करणारे आहे. इथे प्रशासन, अभ्यासक्रम, विविध कोर्सेस यांचे अभिनव उपक्रम होतात. त्यांचे अनुकरण अन्य विद्यापीठे करतात. जलयुक्त विद्यापीठ हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. इथली प्रत्येक गोष्ट समाजाला दिशा देणारी आहे.''

नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, गजानन पळसे, व्ही. टी. पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. के. कामत, डॉ. नमिता खोत, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह अधिविभाग प्रमुख, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# कोल्हापूरकरांच्या प्रेमातून मी कोल्हापूरमय : कुलगुरू डॉ. शिंदे

## शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कारांचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील साडेचार वर्षांचा कालावधी अविस्मरणीय आहे. सामूहिक प्रयत्नातून काय साध्य होते, याची असंख्य उदाहरणे या कालावधीत अनुभवता आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्मभूमीतून मी राजर्षी शाहू महाराजांच्या कर्मभूमीत आलो. कोल्हापूरकरांचे प्रेम एवढे मिळाले, की मी कोल्हापूरमय झालो, असे भावपूर्ण उद्‌गार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा उत्कृष्ट अधिविभागाचा पुरस्कार सोमवारी पदार्थविज्ञान विभागाला देण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना विभागप्रमुख डॉ.पी.एस.पाटील. यावेळी डावीकडून डॉ.उद्धव भोसले, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

डॉ. शिंदे यांचा कार्यकाळ संपत आला असून, हा त्यांच्या कार्यकाळातील शेवटचा वर्धापन दिन होता. यानिमित्ताने डॉ. शिंदे यांनी साडेचार वर्षांत विद्यापीठात झालेल्या विविध उपक्रमांची, योजनांची माहिती दिली.

पान २ वर »

# कोल्हापूरकरांच्या प्रेमातून मी कोल्हापूरमय : कुलगुरू डॉ. शिंदे

» पान १ वरून

ते म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून पुण्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि पुढे पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या तीन विद्यापीठांचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मला लाभली. याचे श्रेय शिवाजी विद्यापीठ परिवाराला आहे. विद्यापीठातील सहकाऱ्यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पूरग्रस्तांसह पूरग्रस्त जनावरे, विद्यार्थी यांना मदतीचा हात दिला, त्याला तोड नाही. पूर्वीच्या जलसाठ्यांच्या जोडीला काही जुन्यांचे पुनरुज्जीवन आणि नव्याने उभारणी यातून कॅम्पसवरील जलसाठ्यांची साठवण क्षमता ३१ कोटी लिटरपर्यंत वाढविण्यात यश आले."

ते म्हणाले, "कॅम्पसवर तीन धरणांसह १० शेततळी आणि ९ विहिरी आहेत. पाण्याच्या बाबतीत विद्यापीठ स्वयंपूर्ण बनले आहे. पूर्वीच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या जोडीला सहा हजार लिटर प्रतितास क्षमतेचा आर.ओ. प्रकल्प उभारला. अनेक नवीन संशोधन केंद्रे, परदेशी विद्यापीठांशी करार, रुसाच्या अनेक योजना या काळात करता आल्या. विद्यापीठाला मिळालेले 'आयएसओ' मानांकन हा विद्यापीठाच्या प्रगतीतील मैलाचा दगड ठरला आहे." यावेळी नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व पसायदान सादर केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

पदार्थविज्ञान उत्कृष्ट अधिविभाग

शिवाजी विद्यापीठाने या वर्षीपासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरवात केली. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे असे दोन गट करून अधिविभागांचे मूल्यमापन करून पुरस्कार देण्यात येत असून, संबंधित विभागाला पारितोषिकापोटी १० लाख रुपये, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देण्याचे ठरले. यंदाचा उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पहिला पुरस्कार पदार्थविज्ञान विभागाने पटकाविला. डॉ. पी. एस. पाटील यांनी कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

### विविध पुरस्कार आणि पुरस्कारार्थी :

- गुणवंत शिक्षक : प्रा. डॉ. संजय शामराव चव्हाण (रसायनशास्त्र अधिविभाग)
- गुणवंत सेवक : मनोहर अनंत कुलकर्णी (सहाय्यक अधीक्षक, आस्थापना विभाग), लक्ष्मण भीमराव परीट (प्र. शाळा परिचर, रसायनशास्त्र अधिविभाग)
- संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य : डॉ. धनाजी गोविंदराव कणसे (भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली)
- बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : प्रा. डॉ. भरत नाईक (महावीर महाविद्यालय)
- उत्कृष्ट फोटोग्राफी पुरस्कार : प्रथम (विभागून) : शुभम रमेश हत्तरकी, संकेत उदय माळी, द्वितीय (विभागून) : सुंदरकुमार कांबळे, सुभाष पोपटराव वाणी, तृतीय (विभागून) : उदयगादित्य पाटील, युवराज जगताप.

# ‘कुलगुरू चषक टी-२०’ स्पर्धेस प्रारंभ

## देशभरातील २० संघ सहभागी : दहा दिवस रंगणार सामने, २९ नोव्हेंबर रोजी अंतिम सामना

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठात १७ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी ‘कुलगुरू चषक टी-२०’ क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाला. नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकर गायकवाड यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षीय संघ आणि जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ (नवी दिल्ली) यांच्यामध्ये प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला.**



**कोल्हापूर : १७ व्या अखिल भारतीय विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. मधुकर गायकवाड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, पी. टी. गायकवाड आदी.**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी टी -२० कुलगुरु चषक क्रिकेट स्पर्धेला रविवारपासून प्रारंभ झाला. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गतवर्षी श्रीनगरला स्पर्धा झाली होती. यावर्षी स्पर्धेचा मान कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाला मिळाला आहे.

स्पर्धेत देशभरातील २० संघ सहभागी झाले आहेत. उद्घाटन प्रसंगी सहभागी खेळाडूंनी आपल्या विद्यापीठाचा ध्वज उंचावत संचलन केले. नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. मधुकार गायकवाड यांच्या हस्ते, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, कमलाकर कराळे, शिवाजी विद्यापीठाचे क्रिडा विभाग प्रमुख पी. टी. गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम झाला. उद्घाटनप्रसंगी प्रशासकीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन कामकाजांमधील ताण कमी करण्यासाठी, बौद्धीक चालना मिळण्यासाठी व तणाव मुक्त जीवन जगण्यासाठी क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन देणे हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे, असे प्रतिपादन डॉ. मधुकरराव गायकवाड यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले,‘‘कर्मचाऱ्यांनी क्रीडा कौशल्ये आत्मसात केल्यास आनंदी, आरोग्यमय आणि उत्साही जीवन जगता येते. या अखिल भारतीय स्पर्धा म्हणजे भाषा आणि सांस्कृतिचे आदान- प्रदान करणारे जणू केंद्रच बनलेले आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्याने खिळाडूवृत्ती आणि सांघिक भावनांचा जोपासल्यास कार्यालयीन कामकाजांमध्ये गतिमानता प्राप्त होते.’’

विद्यापीठ क्रीडा विभागाचे प्र. संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राज्य व देशभरातून विद्यापीठीय क्रिकेट खेळाडूंचे २० संघ सहभागी झाले आहेत. दहा दिवस हे सामने चालणार असून ३६० खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. सामने साखळी पद्धतीने खेळवले जाणार असून २९ नोव्हेंबरला अंतिम सामना खेळवला जाणार आहे. यावेळी प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 NOV 2019

तरुण भारत

# 'कुलगुरू चषक' टी-२० स्पर्धेला शानदार प्रारंभ

## स्पर्धेत देशभरातील २० विद्यापीठ कर्मचारी संघांचा सहभाग, सकाळ व दुपारच्या सत्रात रंगणार सामने

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे सोमवारी १७ व्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक" टी-२० क्रिकेट स्पर्धेला शानदार प्रारंभ झाला. स्पर्धेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे माजी कुलगुरू डॉ.मधुकरराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे होते.

यावेळी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.मधुकरराव गायकवाड यांनी प्रशासकीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन कामकाजांमधील ताण कमी होऊन बौध्दिक चालना मिळावी. तसेच तणावमुक्त जीवन जगण्यासाठी क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धा महत्वाच्या असून शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम स्तुत्य आहे. यानंतर बोलताना अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे म्हणाले, कर्मचाऱ्यांनी क्रीडा कौशल्ये आत्मसात केल्यास आनंदी, आरोग्यमय आणि उत्साही जीवन जगता येते. प्रत्येक कर्मचाऱ्याने खिलाडूवृत्ती आणि सांघिक भावना जोपासल्यास कार्यालयीन कामकाजांमध्ये गतीमानता प्राप्त होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, व्ही.टी. पाटील, डॉ.पी.डी.राऊत, डॉ.डी.के. गायकवाड आदी उपस्थित होते.



### आजचे सामने

**(सकाळ सत्र):** ● (सी १ विरुध्द सी ५) – पंजाब विद्यापीठ, चंदीगड विरूध्द राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
● (सी ३ वि.सी ४) – महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक विरूध्द महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
● (डी २ वि.डी ३) – दीनदयाळ उपाध्याय गोरखपूर विद्यापीठ, गोरखपूर विरूध्द केंद्रीय विद्यापीठ, जम्मू.

**(दुपारचे सत्र):** ● (ए १ वि. ए ३) – जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली विरूध्द पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना.
● (ए ४ वि. ए ५) – सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विरूध्द कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
● (बी १ वि. बी २) – जंम्मू विद्यापीठ, जम्मू विरूध्द मुंबई विद्यापीठ, मुंबई.

### टी-२० क्रिकेट स्पर्धेत देशभरातून २० संघांचा सहभाग

राज्य व देशभरातून विद्यापीठीय क्रिकेट खेळाडूंचे २० संघ दाखल झालेले आहेत. अध्यक्षीय संघ व जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्यामध्ये प्रदर्शनीय सामना खेळविण्यात आला. यावेळी प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 NOV 2019
तरुण भारत

# शिक्षणपद्धतीत बदल आवश्यक

## स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले : शिवाजी विद्यापीठाचा वर्धापनदिन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारतातील तक्षशीला आणि नालंदा विद्यापीठांचे पाश्चात्य विद्यापीठांनी अनुकरण केले. भारतीय विद्यापीठे मात्र पारंपारिक शिक्षण व परीक्षा पध्दतीत अडकले आहेत. त्यामुळे परदेशी विद्यार्थ्यांच्या तुलनेत भारताचे विद्यार्थी मागे असतात. परिणामी बरोजगारी वाढते, म्हणून भारतीय विद्यापीठांनी काळानुरूप अभ्यासक्रमासह परीक्षा पध्दती बदलण्याची गरज आहे, असे प्रतिपादन नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापन दिनी आयोजित बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. भोसले म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने समाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, जैवविविधता आणि पाणीसाठा आदी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यापीठ असूनही देशभरातील इतर विद्यापीठासमोर आदर्शवत आहे. विद्यापीठातील जैवविविधत आणि पाणीसाठा पाहून आपल्या विद्यापीठात असा उपक्रम करण्याची प्रेरणा मिळाली. या विद्यापीठातील संशोधक प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी केलेले संशोधनही अव्वल आहे. शिक्षणाच्या बरोबरीनेच आवश्यक असणारी विविध कौशल्ये अवगत करणेही गरजेचे असते. मात्र, त्यांच्याअभावी रोजगाराच्या संधींपासून युवा वर्ग वंचित राहतो. हे चित्र बदलण्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'रुसा' अंतर्गत विद्यापीठाला पाच कोटीचा निधी मिळाला. यातून विविध केंद्रांची उभारणी करण्यात आली. तसेच अर्थशास्त्र विभागाने प्रकल्प ग्रस्तांच्या अभ्यासासाठी ३० लाखांचा निधी विद्यापीठाला मिळवून दिला आहे. संशोधन, पर्यावरण संवधनावर विद्यापीठ नेहमीच भर देते. विद्यापीठाने शिक्षणाच्या कक्षा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत रुंदावल्या आहेत.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. एन. डी. पाटील, धैर्यशील यादव यांनी सुत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मधुकरराव गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते.






कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित समारंभात नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारताना सपत्नीक डॉ. भरत नाईक. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. पारितोषिक स्वीकारताना सपत्नीक प्राचार्य डॉ. धनाजी कणसे.

### विविध पारितोषिक विजेते

उत्कृष्ठ अधिविभाग पुरस्कार : पदार्थविज्ञान अधिविभाग., गुणवंत शिक्षक : डॉ. संजय चव्हाण (रसायशास्त्र अधिविभाग), विद्यापीठातील गुणवंत सेवक: मनोहर कुलकर्णी (आस्थापना विभाग), लक्ष्मण परीट (प्र. शाळा परिचर रसायनशास्त्र अधिविभाग), महाविद्यालयीन गुणवंत प्राचार्य : प्राचार्य डॉ. धनाजी कणसे (भारती विद्यापीठ, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली), बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव : डॉ. भरत नाईक (महावीर महाविद्यालय), अ नॅक मानांकन प्राप्त संलग्न महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य : इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज (सातारा), आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (रामानंदनगर, बुर्ली ), प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार प्राप्त अधिविभाग व विभाग. उत्कृष्ट फोटोग्राफी पुरस्कार: प्रथम (विभागून): शुभम रमेश हतरकी, संकेत उदय माळी, द्वितिय (विभागून): सुंदरकुमार कांबळे, सुभाष पोपटराव वाणी, तृतीय (विभागून): उदयणादित्य पाटील, युवराज जगताप.

#### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या छोट्या प्रतिकृतीचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हा पुतळा रमण कुलकर्णी, अतुल डाके, दिपक महामुणी यांनी तयार केला आहे. त्यामुळे या कलाकारांचा शाल, श्रीफल व बोधचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.